e-news letter

# e जलसेवा Bulletin

Enabling efficient water management
कार्यक्षम जलव्यवस्थापनासाठी

Volume : III Issue : 10 February 2014

Government of Maharashtra
Water Resources Department

• Editor •
T. N. Munde

• Executive Editor •
Sharad Dabhadkar

• Editorial Board •
Mrs. Purnima Desai
Mr.Prashant Kadam
Mrs. Dhanashree Limaye
Mr.Avinash Patil

**Our Vision** *Transform WRD into modern & service driven department through Information & Communication Technology*

## संपादकीय



जलसंपदा विभागाने राबविलेल्या ई-जलसेवा प्रणालीची उपयुक्तता व व्याप्ती पाहून देशातील इतर राज्यातून अंमलबजावणीसाठी विचारणा होत आहे, ही आपल्या सर्वांसाठी निश्चितच अभिमानास्पद बाब आहे.ह्या प्रणालीचा दैनंदिन कामकाजात परिणामकारक व प्रभावीपणे वापर वाढविण्यासाठी अनेक कार्यशाळा तसेच प्रशिक्षण सत्रे मागील वर्षात आयोजित करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे ई-जलसेवा अभियान कार्यक्रम दि. १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर २०१३ या कालावधीत सर्व राज्यात प्रभावीपणे राबविण्यात आला. याचेच फलित म्हणून मागील काही महिन्यात प्रणालीत मोठ्या प्रमाणात माहिती भरण्यात आली आहे याबद्दल सर्वांचे अभिनंदन!

ई-प्रशासन कार्यक्रमाचा भाग म्हणून दृकश्राव्य (Video Conference) सेवा येत्या काही महिन्यात उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही चालू आहे. कार्यतत्पर व जलद सेवा देण्यासाठी प्रचलित कार्यपध्दतीत (Process) आमुलाग्र बदल करणे अनिवार्य आहे. त्यादृष्टिने शासकीय कामकाज प्रक्रियांचे सुसूत्रीकरणाचे (GPR) कामासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. कार्यकारी अभियंता स्तरावरील कार्यगटाकडून ते अंतिम करण्यात येत आहे. तसेच सन २०१४ मध्ये उपअभियंता स्तरावरील प्रशिक्षण म.अ.प्र.प्र. नाशिक यांच्या वार्षिक कार्यक्रमातून पूर्ण करण्यात येईल. ई-जलसेवा प्रकल्प यशस्वी होण्यासाठी आपण वेळोवेळी घेतलेल्या सक्रीय सहभागाबद्दल पुनश्च धन्यवाद ! या निमित्ताने भविष्यातही आपल्याकडून अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

**प्रत्यक्ष डेटा भरण्यासाठी वापरावयाच्या संकेत स्थळाचा पत्ता**
https://wrd.maharashtra.gov.in
ई-जलसेवा विषयक सर्व प्रकारच्या अडचणींसाठी /सल्ल्यासाठी
सहाय्यता केंद्र संपर्क क्र. : ०२०-२५४४०३९३
E-Mail : icis.support@wipro.com

## e-Jalseva for a better tomorrow for WRD !

**Ramesh Nikum** CE & JS (IM),Mantalaya, Mumbai.



e-Jalseva is a unique and pioneering endeavor in the water sector, in the direction of good governance. Efficient water usage through quick, timely and well informed decisions based on abstracted real time data will be on of the most remarkable outcomes of e-Jalseva.

In Mantralaya, a variety of information on various aspects is required for the formulation and implementation of policies. Regularly, information is being requested from field offices, keeping them busy in data collection and compilation, which not only consumes an immense amount of resources but may be quite costly as well. At the same time, due to the delay in receiving abstracted information, the decisions at Mantralaya too, get delayed causing hindrances to good governance. Through e-Jalseva however, all data will be available online, hence the application will be instrumental in expediting this entire process. Moreover, the time spent in various meetings, for monitoring and reviews, would also be saved by e-Jalseva, resulting in the field officers being available for their site work and core duties.

Standardization of practices throughout the state, especially for Irrigation management (in NI /farmer assessment ) is another desired benefit from e-Jalseva. Every three years, the accurate assessment of the impact of water tariff structures will be possible due to the availability of data in all categories e.g. impact of penalties due to excess water usage, or the impact of discounts for agricultural type industries could be studied with the exact quantum of water usage, amount levied and recovered. This impact analysis will help rationalize the tariff structure based on various matrices.

Maharashtra is the pioneering state for publishing annual reports such as Irrigation status report, Water auditing report and Benchmarking report. A majority of tables in these reports will now be generated through e-Jalseva, saving great time and efforts for the statistical wing and MWRRA. With the support of all employees in digitizing the departments' entire data, e-Jalseva will deliver a lot of useful and accurate information such as - number of beneficiary farmers, Project affected persons in Maharashtra, NI users and NI usage,PAP's, water storage levels, rainfall etc.. Farmers and Industrialists will receive water charges bills through e-mail and SMS through e-Jalseva..

Friends, don't evaluate the e-Jalseva application by sitting on the banks, jump into this movement, come up with improvements and get those implemented, resulting to e-Jalseva evolving into a highly user friendly and efficient final product that suffices the needs of all users.

I have no doubt that eJalseva would ultimately lead us to achieve open and inclusive governance with fair transparency. I appeal to all WRD officers to actively participate in this movement not only through data digitization/validation but also by suggesting improvements in e-Jalseva for a better tomorrow and the reinstatement of the shining glory of MWRD

## ऑनलाईन मासिक लेखा



श्री. पी. जी. पाटील
सहसचिव व आंतरवित्त सल्लागार जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

जलसंपदा विभागाने ई प्रशासनाचा भाग म्हणून माहिती व्यवस्थापन प्रणाली विकसित केली असून यात चौतीस मोडयुल्सचा समावेश आहे. बांधकाम व सिंचन व्यवस्थापन या महत्वाच्या कार्यप्रकारासोबत मासिक लेखा, लेखा परिच्छेद व्यवस्थापन, माहितीचा अधिकार, तारांकित प्रश्नाशी संबधीत मोडयुल्स विकसित केले असून ते दैनंदिन कामकाजासाठी उपलब्ध आहेत. यापैकी मासिक लेखा करण्यासाठी एम २४ हे मोडयुल आहे. महालेखाकार, नागपूर यांनी आपल्या विभागाने घेतलेला पुढाकार बघून मासिक लेखा ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत विचारणा केली होती. यानंतर महालेखाकार कार्यालय, पिएमओ ऑफिस व विप्रो यांनी विचारविनिमय करून फॉर्म क्र.१००,१०१,१०२,व ९४ हे मुख्य फॉर्म ऑनलाईन सादर करण्याबाबत खुपच चांगली कामगिरी केली आहे. या फॉर्मची यशस्वी चाचणी करून मासिक लेखा विभागाकडून ई जलसेवा मार्फत भरण्याची कार्यवाही सुरू आहे. याचाच पुढचा भाग म्हणून या मोड्यूलमध्ये लेखा सादर करण्यासाठी (वेब सर्व्हिस) टॅब उपलब्ध करून देण्यात येत आहे. आता प्रत्येक विभागाला त्यांचे कडील मासिक लेखा परस्पर महालेखाकार नागपूर यांना यापुढे सादर करता येईल. मासिक लेखा ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी मा.प्रधान सचिव द्वय यांनी सूचना दिल्या आहेत. नाशिक,पुणे व ठाणे विभागातील कार्यकारी अभियंता यांच्या विशेष बैठका घेण्यात आल्या असून मासिक लेखा ऑन लाईन करण्याबाबत सर्वांना सूचित करण्यात आले आहे. सध्या १५० पैकी १०० विभागांनी ऑन लाईन मासिक लेखा सादर करण्यासाठी कार्यवाही केली आहे. उर्वरित विभागांनीही जानेवारी २०१४ चा मासिक लेखा ७ फेब्रुवारी १४ पर्यंत भरणे अनिवार्य आहे. ही सुविधा उपलब्ध झाल्याने मासिक लेखा अचूक व वेळेवर सादर करणे, अर्थसंकल्पीय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाचा ताळमेळ करणे सोपे होणार आहे. सर्व लेखाविषयक माहिती ऑनलाईन उपलब्ध होणार आहे या निमित्ताने सर्व नियंत्रक व क्षेत्रिय अधिकारी यांना हे मोडयूल वापरण्यासाठी आवाहन करीत आहे.



कार्यकारी अभियंतास्तरीय विशेष प्रशिक्षण-म.अ.प्र.प्र. नाशिक

## ई-प्रशासन प्रशिक्षण



इंजि. अविनाश पाटील प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे

राष्ट्रीय उत्पादकता परिषद, नवी दिल्ली यांचे मार्फत ६/१/२०१४ ते १०/१/२०१४ या कालावधीत e-governance issues & challengs या विषयावरील प्रशिक्षण पोर्ट ब्लेअर (अंदमान) येथे आयोजित करण्यात आले होते. ई प्रशासन प्रकल्पाची उद्दीष्टे, प्रकल्प राबविताना येणाऱ्या अडचणी, परिवर्तन व्यवस्थापन, सुरक्षा संबंधी घ्यावयाची काळजी, माहिती व्यवस्थापन, मोबाईल गव्हर्नन्स, आयसीटी टुल्स, बीपीआर व जीपीआर तसेच Cloud computing या विषयावर नामवंत व्याख्यात्यांची व्याख्याने झाली. सन २००४ चे त्सुनामीमध्ये अंदमानमध्ये ई प्रशासनाच्या माध्यमातून मदत व पुनर्वसन कार्यक्रम राबविण्यात आला. त्याबद्दल राष्ट्रीय माहिती केंद्राचे अधिकाऱ्यांनी सादरीकरण केले. आपल्या ई जलसेवा प्रकल्पामध्ये मोबाईल ग्रुप मॅसेज विविध प्रशिक्षणासाठी राबविण्यात येतो ही संकल्पना सर्वांनाच आवडली. त्सुनामीमध्ये मोबाईल मॅसेजमुळे अनेकांचे प्राण वाचले. अशी माहिती एनआयसीच्या अधिकाऱ्यांनी दिली. आपल्या प्रकल्पात देखील अनेक बाबींमध्ये मोबाईल गव्हर्नन्स वापरणे शक्य आहे असे वाटते. सध्या मी कोयना संकल्पचित्र मंडळांतर्गत परिवर्तन व्यवस्थापन विभागात काम करीत आहे व जलसंपदा विभागाचे ई जलसेवा प्रशिक्षणामध्ये समन्वयाची भूमिका बजावित आहे. या प्रशिक्षणामधून नवीन उत्साह व उमेद घेवून मी आलो आहे. प्रशिक्षणामध्ये केंद्र शासनाच्या विविध खात्यातील अधिकारी उपस्थित होते. त्यांच्याशी समन्वय साधन्याची व माहितीची देवाणघेवाण करण्याची संधी मला मिळाली. आपल्या प्रकल्पासाठी प्रशिक्षणात प्राप्त झालेल्या ज्ञानाचा व उत्साहाचा निश्चितच फायदा होईल असा मला विश्वास आहे. अधिक्षक अभियंता टी. एन. मुंडे सर तसेच शासनाने मला या प्रशिक्षणास जाण्याची संधी दिल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद!



ई-प्रशासन प्रशिक्षण-पोर्टब्लेअर

## ई-जलसेवा वृत्तांत

1. WRD test site (wrdtest.maharashtra.gov.in/portal)is up and running for testing as well as practice purpose.
2. Agreement for the pilot work of e Service Book is signed between Maha Online Ltd and Koyna design circle
3. All WRD offices who are undergoing e Tendering can send their Tender notices to egovpmo_pune@wrd.maharashtra.gov.in so as to publish it on WRD portal
4. HoW EJEE workshops for Executive Engineers (136 nos) completed at META Nashik
5. The work regarding Video conferencing solution of WRD offices is in progress

## Be an ICIS e-news author......



We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day department activities.